# निवडणूक निर्णय अधिकारी

145 मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघ
पत्ता :- प.पु. केशव भवन इमारत, तळमजला, मॅक्सेस मॉलच्या मागे,
अमृतवाणी मार्ग, अप्पर तहसिलदार कार्यालयाच्या खालील, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे 401101

**स्विप पथक**

---

**क्र./ निवडणूक/मि.भा.वि.स./कावि-९०५५ /2024** | **दि. २९ /10/2024**

## // प्रेस नोट //

१४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघ, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालया मार्फत मतदारांमध्ये जनजागृती करणेकामी दि. २१/१०/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता भाईंदर सेकंडरी स्कूल, भाईंदर (प) येथे दिवाळी सणाचे औचित्य साधून मतदार महोत्सव साजरा करण्यात आला. १४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघातील सदर कार्यक्रमात मनपा शाळा क्रमांक १६ मराठी माध्यम, मनपा शाळा क्र.१७ गुजराती माध्यम, मनपा शाळा क्र.१८ हिंदी माध्यम, मनपा शाळा क्र.३० हिंदी माध्यम, मनपा शाळा क्र.३१ उर्दु माध्यम, कारनेशन स्कूल आणि भाईंदर सेकंडरी स्कूल प्राथ/माध्यमिक विभाग या शाळांचा सहभाग होता. तसेच सदर शाळांमध्ये मतदार साक्षरता मंच स्थापन करुन मतदार महोत्सव साजरा करण्यात आला.

स्विप कार्यक्रमांतर्गत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मतदार जनजागृती करण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी विदयार्थ्यांनी रंगीबेरंगी आकाश कंदिल आणि भेटकार्ड तयार करून त्यावर मतदान जनजागृती संदेश देवून दि. २० नोव्हेबर २०२४ रोजी मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

आपले मत आपला आवाज, मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो अशा घोषणा विदयार्थ्यांनी दिल्या. सदर कार्यक्रमाकरीता १४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघातील स्विप पथक, शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. मतदार प्रतिज्ञा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

Scanned with OKEN Scanner